# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, कु. प्रगती शहाजीराव पाटील यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली 'मेघना पेठे यांच्या कथालेखनाचा अभ्यास' ('हंस अकेला' आणि 'आंधळयाच्या गायी' या कथासंग्रहाच्या आधारे') या विषयावर एम. फिल. पदवीसाठीच्या प्रबंधिकेचे संशोधन कार्य पूर्ण केले आहे. त्यांनी ही प्रबंधिका स्वतंत्ररित्या लिहिली असून यापूर्वी या विषयावर कोणत्याही विद्यापीठात या स्वरुपाचे संशोधन कार्य झालेले नाही. या प्रबंधिकेसाठी त्यांनी योग्य त्या संदर्भ साधनांचा उपयोग केला असून त्याचा निर्देश संशोधन परिप्रेक्षामध्ये केलेला आहे.

सदर प्रबंधिका शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल . (मराठी) पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

मार्गदर्शक

(डॉ. गिरीश मोरे)

स्थळ : कोल्हापूर

दिनांक : १३ फेब्रुवारी २००७

# प्रतिज्ञापत्र

'मेघना पेठे यांच्या कथालेखनाचा अभ्यास' ('हंस अकेला' आणि 'आंधळ्याच्या गायी' या कथासंग्रहाच्या आधारे) या विषयावरील सदरची प्रबंधिका, मी शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल. (मराठी) पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे.

ही प्रबंधिका अथवा तिचा कोणताही भाग मी अन्यत्र कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

अभ्यासक

प्रशपाटील

स्थळ : कोल्हापूर **(प्रगती शहाजीराव पाटील)**

दिनांक : १३ फेब्रुवारी २००७

“आम्हाला पंख येऊन उडता
यावे म्हणून धडपडणाऱ्या
माझ्या आई - आबांना”

# ऋणनिर्देश

'मेघना पेठे यांच्या कथालेखनाचा अभ्यास' ('हंस अकेला' आणि 'आंधळ्याच्या गायी' या कथासंग्रहाच्या आधारे) या विषयावरील एम. फिल. (मराठी) या पदवीसाठी ज्यांनी-ज्यांनी मला सहकार्य केले त्या सर्वांचे आभार व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजते.

माझ्या प्रबंधिकेचे मार्गदर्शक डॉ. गिरीश मोरे यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करते. त्यांनी मला विषय निवडीपासून प्रबंधिका पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी सखोल मार्गदर्शन केले. संशोधन करताना कोणतीही पुस्तके का व कशी अभ्यासायची, तसेच अवांतर वाचनाचा विस्तार कसा वाढवायचा, याचे दिशादर्शन केले. या मार्गदर्शनाचा संशोधनासाठी मला अतिशय चांगला उपयोग झाला. या मार्गदर्शनाबद्दल मी त्यांची सदैव ऋणी आहे. सौ. शर्मिला मोरे मॅडम यांचीही मला मदत झाली मी त्यांची सदैव ऋणी आहे.

याचबरोबर शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे विभागप्रमुख डॉ. कृष्णा किरवले, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. रणधीर शिंदे, प्रा. हिमांशू स्मार्त यांचेही वेळोवेळी मार्गदर्शन मला मिळाले त्याचबरोबर माझ्या पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ. बाबुराव गुरव, त्याप्रमाणे प्रा. शरयू आसोलकर मॅडम यांचेही मार्गदर्शन मला मिळाले.

याचबरोबर माझ्या शिक्षणासाठी सतत कष्ट करणारे माझे आई-आबा यांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मला मिळाले नसते तर ही मी प्रबंधिका पूर्ण

करू शकले नसते. त्यामुळे त्यांचे ऋण मी आयुष्यभर विसरू शकणार नाही. त्याचबरोबर माझी मोठी बहीण डॉ. रुपाली सावंत व दाजी डॉ. प्रशांत सावंत, सुमित सावंत, लहान बहीण दीपाली पाटील, मावशी श्रीमती सुभद्रा पाटील, आजी सौ. चंद्रभागा पाटील, माझे दादा श्री. गोपाळ पाटील यांचे सहकार्य माझ्या लेखनासाठी खुपच उपयोगी पडले आहे.

माझ्या संशोधन कार्यासाठी माझ्या मित्र परिवारानेही मला सहकार्य व प्रोत्साहन दिले. माधुरी बिडवे, सुनीता कांबळे, सुवर्णा गावडे, वैशाली चौगुले, रुपाली चव्हाण, सुमन येसणे, शैलजा गवळी, नीता व स्मिता ढाकरे, नागिण सर्वगौड, संगीता मोहिते, कांता कांबळे, सुषमा नामे, शीला देशमुख, संगिता पाटील, वनीता खरात, रुपाली जाधव, बालाजी शिंदे, प्रदीप कांबळे, चंद्रकांत कदम, गजानन अपिने, महादेव कांबळे यांचेही मला सहकार्य व प्रोत्साहन मिळाले या सर्वांची मी आभारी आहे. मराठी विभागाचे लिपिक विनय पाटील व शिपाई सतीश कुसुंबे (मामा) यांचेही मला सहकार्य मिळाले.

संशोधनासाठी ग्रंथ उपलब्ध होण्याचे ठिकाण म्हणजे शिवाजी विद्यापीठातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय. या ग्रंथालयातील ग्रंथपाल एस. एम. पुजारी व इतर कर्मचाऱ्यांनी मला आवश्यक असलेले ग्रंथ वेळेत उपलब्ध करून दिल्याने मी त्यांचीही आभारी आहे.

**पाटील प्रमती शहाजीराव**

ठिकाण : कोल्हापूर
दिनांक : १३ फेब्रुवारी २००७

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | भूमिका | १ ते २ |
| १ | मराठी कथालेखनात स्त्रियांचे योगदान | ३ ते ३४ |
| २ | मेघना पेठे यांच्या कथालेखनाची आशयसूत्रे | ३५ ते ७४ |
| ३ | मेघना पेठे यांच्या कथालेखनातील व्यक्तिरेखा | ७५ ते ११४ |
| ४ | मेघना पेठे यांच्या कथालेखनाचे रचनाविशेष | ११५ ते १५१ |
| ५ | उपसंहार | १५२ ते १६७ |
| | **परिशिष्टे** | १६८ ते १७३ |
| | १) संदर्भ ग्रंथ सूची | |
| | २) नियतकालिक सूची | |

# 'मेघना पेठे यांच्या कथालेखनाचा अभ्यास'
## ('हंस अकेला' आणि 'आंधळ्याच्या गायी' या कथासंग्रहाच्या आधारे)

## भूमिका

एम. फिल. प्रबंधिकेसाठी **'मेघना पेठे यांच्या कथालेखनांचा अभ्यास'** हा विषय निवडण्यात आला आहे. हा विषय आजच्या परिस्थितीत अभ्यासणे महत्त्वाचे वाटते. १९६० नंतर मराठी साहित्यात स्त्रीवादी साहित्य प्रवाह निर्माण झाला. या प्रवाहामध्ये मेघना पेठे यांचे लेखन अतिशय वेगळे जाणवते. स्त्रियांच्या प्रश्नाकडे त्या अतिशय तटस्थपणे पाहतात. 'मी स्त्री आहे' असे भांडवल न करता त्यांच्या व्यक्तिरेखा येतात. फक्त स्त्रीजीवनाचेच चित्रण न करता मेघना पेठे यांनी एकूणच मानवी जीवनाचा समग्र वेध घेतला आहे. त्यांच्या कथा समाजव्यवस्थेची चिकित्सा करतात. वाचकांना विचारप्रवण करतात. साहित्याकडे त्या अतिशय गांभीर्याने पाहतात. मानवी जीवनातील विविधांगी अनुभव अगदी सहजपणे व थेटपणे त्यांच्या कथेत येतात. मेघना पेठे यांनी प्रामुख्याने महानगरीय जीवनाचे चित्रण केलेले दिसून येते. या दृष्टीने हा विषय महत्त्वाचा वाटतो.

मेघना पेठे यांचे 'हंस अकेला' व 'आंधळ्याच्या गायी' हे दोन कथासंग्रह, 'नातिचरामि' ही कांदबरी, स्फुटलेखन व काही ललितलेखन प्रसिद्ध असले तरी प्रस्तुत अभ्यासासाठी मेघना पेठे यांच्या 'हंस अकेला' व 'आंधळ्याच्या गायी' या दोन कथासंग्रहांचा आधार घेतला आहे.

प्रस्तुत अभ्यास विषयाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे निश्चित केली आहेत.

१) कथा वाङ्मयाचे स्वरूप व मराठीं कथालेखनामध्ये स्त्रियांचे योगदान अभ्यासणे.

२) मेघना पेठे यांच्या कथालेखनाची आशयसूत्रे अभ्यासणे.

३) 'हंस अकेला' आणि 'आंधळ्याच्या गायी' या साहित्यकृतींमधील व्यक्तिरेखा अभ्यासणे.

४) मेघना पेठे यांच्या कथालेखनाचे रचनाविशेष अभ्यासणे.

५) मेघना पेठे यांच्या कथालेखनाचे वेगळेपण शोधणे.

मेघना पेठे यांच्या कथालेखनाचा अभ्यास समाज वाङ्मयीन दृष्टीने करण्याचे योजिले आहे. त्यानुसार 'हंस अकेला' व 'आंधळ्याच्या गायी' या दोन कथासंग्रहामधील आशयसूत्रे, व्यक्तिरेखा अभ्यासून या साहित्यकृतीचे रचनाविशेष अभ्यासावयाचे आहेत.